**Subject Code : 07**

**March, 2014**

# MARATHI

*Time* : 3 *Hours* 15 *Minutes* ] [ *Total No. of Questions* : 74 ] [ *Max. Marks* : 100

**सूचना :** i) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

ii) उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

I. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा : 1 × 10 = 10

1) रम्य ते बालपण

2) विज्ञान — शाप की वरदान ?

3) आई — एक महान दैवत

4) जीवनात खेळाचे महत्व

5) राष्ट्रीय एकात्मता.

II. अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची **एक-दोन** वाक्यात उत्तरे लिहा : 5 × 1 = 5

6) अवजपूरची स्त्री कोणत्या यात्रेला जात होती ?

7) शत्रुपक्षाकडून आरमारला कोणता धोका होऊ शकतो ?

8) फाल्गुन रावांनी भादव्याला कोणते काम सांगितले ?

9) आंबेडकर मास्तर शाळा सुरू झालयावर कोठे जात ?

10) आपल्या देशाचा फार मोठा समाज हजारो वर्ष कशापासून वंचित होता ?

11) शेतीचा शोध कोणी लावला ?

12) कोणत्या चित्रांना आदिमानवाची चित्रे असे समजले जाते ?

ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा : 1 × 6 = 6

13) संत वेमन्ना व तुकाराम यांचे अभंग काय सांगतात ?

14) लेखकाने मोराच्या प्रत्यक्ष हालचालींचे वर्णन कसे केले आहे ?

15) हॉटेलमालक शंकरभट्टांशी निवेदकाने कोणता संघर्ष केला व तो का ?

क) खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा : 2 × 4 = 8

16) आरमारच्या धावणीबाबत घ्यावयाची दक्षिता.

17) केसिक येथील धर्ममेळावा.

18) साने गुरूजींच्या वाङःमयाचे महत्व.

19) संत ज्ञानेश्वर आणि पां० वा० गाडगीळ यांचे कार्य.

ड) खालीलपैकी कोणत्याही **दोहोंचे** ससंदर्भ स्पष्टीकरण करा : 2 × 3 = 6

20) "राउळ मायः राउळ बापुः राउळाचेनि प्रसादें आम्ही पाणी पीत असों".

21) "ज्याची सत्ता त्याची लत्ता खाल्लीच पाहिजे".

22) "अस्पृश्यांच्या पोरांना मी संस्कृत शिकवणार नाही".

23) "हा युद्धकाळ आहे, माणसे ऐकण्याच्या, विचार करण्याच्या परिस्थितीत नसतात जरा जपून बोला".

III. अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची **एक-दोन** वाक्यात उत्तरे द्या : 5 × 1 = 5

24) 'परिस' म्हणजे काय ?

25) नुसत्या नटव्याने काय होते ?

26) आयुष्य वितळवून सोन्याचे घड ओतणारे कोण आहेत ?

27) तेचाजी लाट कुठे वाहते ?

28) रेल्वे प्लॅटफॉर्मवरील कोवळया पोराचे काय हरवले होते ?

29) पारंपारिक स्त्रीला कशाची हौस आहे ?

30) सश्यांना काय वर्ज्य आहे ?

ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा : 1 × 6 = 6

31) श्रीकृष्ण व रूक्मिणी यांच्या विवाह प्रसंगाचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

32) 'ठरवितें किती मी' या कवितेतील नायिकेला निसर्गाने त्याच्याकडे जाण्याच्या तयारीत कशी मदत केली ?

33) 'तणकट' या कवितेचा भावार्थ लिहा.

क) खालीलपैकी कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा : 2 × 4 = 8

34) नामदेवाचे मागणे.

35) ना. धों. महानोर यांची भूमीबद्दलची भावना.

36) 'तुझ्या कानातली झुंबरे' मधील अधिकऱ्यांची मानसिकता.

37) राखाडी रंगाचे ससे.

ड) खालीलपैकी कोणत्याही **दोहोंचे** संदर्भासह स्पष्टीकरण करा : 2 × 3 = 6

38) "समजले आणि वर्तले। तेचि भाग्यपुरुष जाले।
या वेगळे उरले। ते करंटे पुरुष।।"

39) पायतळी पाषाणास
आहे काही म्हणायचे
संपले ते पर्व आता
रडायचे, कण्हायचे.

40) परमेश्वर सानिध्य साधू पाहणारी ही पुरातन संस्कृती
आपली आपणच टवाळी करू नये, तर काय करावे ?

41) तपासला पुनःपुन्हा
माझ्या गतायुष्यातला हिशोब
निरर्थक.

IV. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : 2 × 5 = 10

42) पोपट या लहानग्याच्या वेदनेचे स्वरूप स्पष्ट करा.

43) भाबड्या बकसचे शब्दचित्र रेखाटा.

44) 'कलिंगड' या कथेमधील आई लेकीचे नाते उलघडून दाखवा.

45) 'गोष्ट तिची' या कथेतील नायिका स्वतःबाबत काय विचार करते ?

V. अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर बातमी तयार करा. 1 × 5 = 5

46) तुमच्या आवडत्या शिक्षकाला 'आदर्श शिक्षक' पुरस्कार मिळाला बातमी तयार करा.

47) खो-खो-स्पर्धेत तुमच्या महाविद्यालयाची झालेली राज्यस्तरीय-निवड.

48) तुमच्या गावात महापूर आला आहे या विषयावर बातमी तयार करा.

ब) कंसातील सूचनेप्रमाणे प्रश्न सोडवा : 5 × 1 = 5

49) एकू दी मातांगी वीनवीले ( प्रमाण मराठीत लिहा.)

50) सुरेशने घर पाहिले. ( प्रयोग ओळखा )

51) उनाड पोरे (अभ्यास) लक्ष घालत नाहीत. ( कंसातील शब्दाचे सामान्य रूप करा )

52) सुमा चांगला स्वंयपाक करेल. ( काळ आलेखा )

53) सुमनने पिंकीला बालक मंदिरात सोडले. ती बाजारात गेली. ( संयुक्त वाक्य करा )

क) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. 5 × 1 = 5

54) अठराविश्वे दारिद्र्य असणे.

55) कानाडोळा करणे.

56) रामराम ठोकणे.

57) हातावर तुरी देणे

58) वाखाणणी करणे.

ड) रूढ इंग्रजी शब्दांना पर्यायी मराठी शब्द लिहा : 5 × 1 = 5

59) कम्युनिटी

60) इनडोअर शुटिंग

61) शेअर्स कॅपिटल

62) कारटून्स

63) सॅटेलाईट.

इ) अधोरेखित शब्दांच्या विभक्ती ओळखा : 5 × 1 = 5

64) जनाबाईचे वाङमय भक्तीपर आहे.

65) मी गावाहून आलो.

66) गावात हत्ती आला.

67) मला माझ्या संपादकाने सांगितले आहे.

68) मुलांनो ! अभ्यास करा तो मन लावून.

VI. उतारा वाचून खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 5 × 1 = 5

प्रथम चित्ताची एकाग्रता कोणत्याही कामात चित्ताची एकाग्रता आवश्यक असते. व्यावहारिक गोष्टीतसुद्धा एकाग्रता लागते. व्यवहारातले गुण निराळे व परमार्थातले गुण निराळे असे काही नाही. व्यवहार शुद्ध करणे म्हणजेच परमार्थ. कोठलाही व्यवहार असो, तेथील यशापयश तुमच्या एकाग्रतेवर अवलंबून आहे. व्यापार, शास्त्र संशोधन, राजकारण, मुत्सद्देगिरि काहीही घ्या; प्रत्येक ठिकाणी जे यश मिळेल ते त्या त्या पुरुषाच्या चित्ताच्या एकाग्रतेवर आहे नेपोलियनची अशी गोष्ट सांगतात की, युद्धाची व्यवस्था एकदा नीट लावून दिली म्हणजे तो समर भूमीवर गणिताचे सिद्धांत सोडवीत असे. तंबूवर गोळे पडत माणसे मरत पण नेपोलियनचे चित्त गणितातच मग्न नेपोलियनची एकाग्रता फार मोठी होती असे मी म्हणत नाही त्याहून उच्च एकाग्रतेच्या गोष्टी सांगता येतील. परंतु तीत्याच्याजवळ किती होती ते पहा. खलिफा उमरची अशीच गोष्ट आहे. लढाई चालु असताना जर प्रार्थनेची वेळ झाली तर लगेच चित्त गुडघे टेकून भर रणांगणात तो प्रार्थना करू लागे. व प्रार्थनेत त्याचे चित्त इतके निमग्न होई की, कोणाची माणसे कापली जात आहेत याची जाणीव त्याला नसे पहिल्या मुसलमानांच्या या परमेश्वर निष्ठेमुळे या एकाग्रतेमुळेच इस्लाम धर्माचा प्रसार झाला.

**प्रश्न :**

69) परमार्थ म्हणजे काय ?

70) व्यवहारातील यशापयश कशावर अवलंबून आहे ?

71) नेपोलियनच्या एकाग्रतेचे कोणते उदाहरण येथे दिले आहे ?

72) इस्लाम धर्माचा प्रसार कशामुळे झाला ?

73) खलिफा उमर रणांगणात लढाई शिवाय काय करीत असे ?

**किंवा**

74) प्राध्यापक पदावर नेमणुकी करिता सचिव, कर्नाटक राज्य लोक सेवा आयोग, बेंगळूर यांना आवेदन पत्र लिहा.